जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २८.०६.२०२५**

‘‘ वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक दलाल महिला आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ’’

दिनांक २७/०६/२०२५ रोजी रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती चेतना चौधरी यांना माहिती मिळाली की, ‘‘हॉटेल शुभम कम्फर्ट रेस्टॉरंट, शिळ डायघर रोड, कल्याण फाटा, ठाणे या ठिकाणी एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे.’’ सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून एक दलाल महिलेस ताब्यात घेवुन तिच्या रखवालीत असलेल्या ०४ पिडीत महिलांची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत महिला आरोपीविरूध्द डायघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर ।६९९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १४३(१), १४३(३), सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दिनांक दाखल करण्यात आला असून आरोपी महिलेस अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध), गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती चेतना चौधरी, मपोउपनि/स्नेहल शिंदे, सपोउपनि/वालगुडे, पोहवा/किशोर पाटील, सुवारे, मपोअंम/खरात, थोरात, पोअंम/व्ही.बी.यादव चापोशि/पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर